कारण सांगणारी
लोकं यशस्वी
होत नाहीत आणी
यशस्वी होणारे
लोक कारण सांगत
नाहीत


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | शुक्रवार १३ जून २०२५ | अंक १७६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# सकाळी सकाळी उलट्या, उठून बसण्यासाठीही त्रास,

## बच्चू कडू यांची प्रकृती प्रचंड खालावली, कार्यकर्त्यांची चिंता वाढली

प्रहार संघटनेचे नेते आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी अन्न त्याग आंदोलन सुरु केले आहे. गेल्या पाच दिवसांपासून बच्चू कडू यांचं हे आंदोलन सुरू आहे. या पाच दिवसात बच्चू कडू यांनी अन्नाचा कणही घेतला नाही. त्यामुळे त्यांची प्रकृती अत्यंत खालावली आहे. आज सकाळीच त्यांना उलट्या झाल्या. त्यांना उठून बसण्यासाठीही त्रास होत आहे. त्यामुळे बच्चू कडू यांच्या राज्यभरातील कार्यकर्त्यांची चिंता वाढली आहे. बच्चू कडू यांचे कार्यकर्ते उपोषणस्थळी येत आहेत. बच्चू कडू यांच्या अन्न त्याग आंदोलनाचा आत पाचवा दिवस आहे. पाच दिवसात बच्चू कडू यांनी अन्नाचा कणही घेतला नसल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. बच्चू कडू यांना उठून बसण्यासाठी त्रास होत आहे. सकाळी सकाळी त्यांना उलट्याही झाल्याने तब्येत आणखीनच खालावली आहे. पाच दिवसापासून पोटात अन्नाचा कणही नसल्याने त्यांचे वजन चार किलोने घटलं आहे. राजू शेट्टी भेटीला दाखल दरम्यान, बच्चू कडू यांची भेट घेण्यासाठी अमरावतीत राज्यभरातून नेते येत आहेत. माजी मंत्री महादेव जानकर यांनीही बच्चू कडू यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला आहे. तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी हे उपोषण



स्थळी पोहोचले आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा सुरु झाली आहे. तर, बच्चू कडू यांची प्रकृती खालावल्याने त्यांची तपासणी करण्यासाठी वैद्यकीय पथक घटनास्थळी दाखल झालं आहे.

### मुख्यमंत्र्यांसोबत ऑनलाईन बैठक

दरम्यान, बच्चू कडू यांच्या मागण्यांबाबत त्यांची आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात आज दुपारी ऑनलाईन बैठक होणार आहे. यावेळी राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळेही उपस्थित राहणार आहेत. या ऑनलाईन बैठकीत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची तारीख केव्हा देणार? तारीख जाहीर झाल्यावरच आम्ही आंदोलन मागे घेऊ, असं बच्चू कडू यांनी स्पष्ट म्हटलंय. त्यामुळे या मुद्द्यावरच आजच्या बैठकीत मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आजच्या बैठकीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे

### बच्चू कडू यांच्या मागण्या

शेतमालाला MSP (किमान दर) वर 20% अनुदान द्यावेआत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना स्वतंत्र मंडळ स्थापन करून 10 लाखाची आर्थिक मदत आणि संपूर्ण कर्जमाफी द्या दिव्यांग आणि विधवा महिलांना 6000 रुपये मानधन द्या शहरासारख्या ग्रामीण भागातील घरकुलासाठीही समान निकष लागू करून किमान 5 लाख अनुदान घरकुल लाभार्थ्यांना द्या धनगर समाजाचे आरक्षण तात्काळ लागू करा धनगर समाजातील बेरोजगार तरुणांना नोकरीत 13 टक्के आरक्षण द्या

# ऑपरेशन सिन्दुर मध्ये सहभागी झालेले जवान कृष्णा खिल्लारे यांचा पोखरी गावातील ग्रामस्थांनी केला सत्कार

बीड प्रतिनिधी:- बीड तालुक्यातील बालाघाट पट्यात असणाऱ्या आदर्श गाव पोखरी येथील गावकऱ्यांनी एक आगळा वेगळा संदेश सर्वांना दिला आहे, पोखरी गावातील कृष्णा खिल्लारे हे जवान मागिल १२ वर्षा पासुन देश सेवा करत आहेत, त्यांनी देशातील विविध भागात आपल कर्तव्य बजावल आहे, सध्या ते काश्मीर खोऱ्यात आपलं कर्तव्य बजावत आहेत, एप्रिल महिन्यात जम्मु काश्मीर मधील पहलगाम येथे आतंकवाद्यांकडून



निष्पाप भारतीय नागरिकांवर झालेल्या हल्लुया नंतर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिन्दुर राबवले आणि आतंकवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवला, या ऑपरेशन सिन्दुर मध्ये पोखरी गावातील जवान कृष्णा खिल्लारे यांनी आपलं कर्तव्य बजावून गावाच नाव लौकीक केल त्यांच्या याच कार्याबद्दल पोखरी ग्रामस्थांनी सध्या सुट्टीवर आलेले जवान कृष्णा खिल्लारे यांचा सत्कार केला, या वेळी गावातील सर्व ग्रामस्थ, महिला भगिनी, विद्यार्थी व तरुण बहुसंख्येने उपस्थित होते...

# वैभवी संतोष देशमुख हिच्या शिक्षणात आर्थिक कारणांमुळे खंड पडू देणार नाही -परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मस्साजोग :(१२जुन) वडिलांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर दुःखाचा डोंगर कोसळला असताना देखील अतिशय कणखरपणे आणि कष्टाने अभ्यास करून वैभवी संतोष देशमुख हिने बारावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवले. हे खरंच कौतुकास्पद आहे. भविष्यात तिला जितके शिक्षण घेण्याची इच्छा आहे, तितके शिक्षण तिने घ्यावे. आर्थिक अडचणीमुळे तिच्या शिक्षणात कुठेही खंड पडणार नाही याची जबाबदारी मी स्वतः घेत आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री ब प्रताप सरनाईक यांनी केले. आज १२ जुन हा संतोष देशमुख यांचा जन्मदिवस आहे .ते नेहमी आपल्या जन्मदिन रक्तदान शिबिर घेऊन साजरा करीत असत. आज देखील त्यांच्या जन्मदिनी त्यांच्या गावात रक्तदान




शिबिर होत आहे. परंतु दुर्दैवाने ते आपल्यामध्ये उपस्थित नाहीत. त्यांच्या संकल्पपुर्ती तुन त्यांच्या स्मृती जपण्याचा प्रयत्न त्याच्या निकटवर्तीय आणि मसाजोग चे ग्रामस्थ करत आहेत, हे प्रत्यक्ष पाहून मी भारावून गेलो आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले. . भविष्यात देशमुख कुटुंबीयांना आणि मसाजोग ग्रामस्थांना शासनाची कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास ते करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. अशी ग्वाही मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिली. या भेटी प्रसंगी कै. संतोष देशमुख यांचे बंधू,मुलगा व मुलगी वैभवी संतोष देशमुख उपस्थित होते. यावेळी १२ वी परीक्षेत चांगले गुण मिळवल्या बद्दल मंत्री सरनाईक यांनी वैभवीला लॅपटॉप भेट देऊन कौतुक केले.

# अहमदाबाद-लंडन विमान अपघात: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्याकडून तीव्र शोकसंवेदना व्यक्त

## महाराष्ट्राची जनता दु:खात सहभागी, मदतीसाठी सर्व यंत्रणाना सज्जतेचे निर्दे

मुंबई, दि. १२ :- अहमदाबाद-लंडन विमान भीषण अपघात अत्यंत हृदयद्रावक, वेदनादायक असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अपघातातील मृत आणि नातेवाईकांप्रति संवेदना प्रकट केली आहे. अनेकांनी आपल्या घरातील कर्ते आणि जीवलग गमावले आहेत. काळाने घातलेली ही झडप अनेक कुटुंबियांसाठी शब्दांच्या पलिकडली आणि हृदय पिळवटून टाकणारी आहे. या सगळ्यांच्या दुःखात आम्ही सर्व, महाराष्ट्राची जनता सहभागी आहे. त्यांना या दुःखद आघातातून सावरण्याची शक्ती मिळो, अशी ईश्वचरणी प्रार्थना करतो, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणतात, अहमदाबाद-लंडन या विमानाची झेप ही अनेकांसाठी अंतिम ठरली. रहिवासी परिसरात हा अपघात



झाल्याने या अपघाताची भीषणता आणखी वाढली. या अपघाताने देश दुःखात बुडला असून, विमानातील प्रवाशी, विमानातील अधिकारी-कर्मचारी, अपघातग्रस्त परिसरातील नागरिक यांच्या कुटुंबियांच्या दुःखाला पारावर राहिलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या अपघाताची गांभीर्याने दखल घेऊन, तातडीने संबंधित यंत्रणांना निर्देशित केले आहे.या कठीण प्रसंगात महाराष्ट्रातील नागरिक, आमच्या सर्व यंत्रणा गुजरातमधील शासन-प्रशासनासोबत ठामपणे उभे आहोत. या आपत्तीच्या काळात अपघातग्रस्त परिसरासह, प्रवाशी आणि जखमीं साठी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेत सक्रीय सहभाग देण्यात येत आहे. अपघातातील जखमींना चांगले उपचार मिळावेत यासाठी तसेच संबंधितांच्या कुटुंबियांना आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी यंत्रणांना निर्देशित करण्यात आले आहे. वाहतुकीच्या सुविधांसाठी, वैद्यकीय उपचार आणि अनुषंगिक उपाययोजनांबाबत सज्जता ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत, असेही मुख्यमंत्र्यानी म्हटले आहे.

# भावसार युवा सेवाभावी संस्थेकडून गुणवंतांचा गौरव

परळी / प्रतिनिधी बोर्ड परीक्षाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून एस.एस.सी आणि एच.एस.सी परीक्षेत परळी शहरातील विद्यार्थी, विद्यार्थींनीनी मोठ्या प्रमाणात यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल व त्यांच्या कतृत्वास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने प्रतिवर्षीप्रमाणे भावसार युवा सेवाभावी संस्थेच्या वतीने शनिवार दि १४ जुन रोजी परळी शहरातील गुणवंताचा गुणगौरव व करीअर मार्गदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शक म्हणुन समाज परिवर्तनकार, प्रबोधनकार, उभ्या महाराष्ट्राचे अभ्यासू आणि तडफदार सुप्रसिद्ध व्याख्याते म्हणून परिचय असलेले वसंत हंकारे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. प्रतिवर्षीप्रमाणे या ही वर्षी भावसार युवा सेवाभावी संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार , मार्गदर्शन,सामाजिक क्षेत्रात निस्वार्थपणे काम करणार्या संस्थांचा आणि समाजातील गरजू, होतकरू महिलांना शिलाई मशीन वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास समाज परिवर्तनकार, प्रबोधनकार, अभ्यासू आणि तडफदार प्रख्यात व्याख्याते म्हणून परिचय असलेले वसंत हंकारे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. आहे.हा गुणगौरव सोहळा शनिवार १४ जुन २०२५ रोजी सांय ६ वा श्रद्धा मंगल कार्यालय, पावर हाउस समोर परळी येथे संपन्न होणार आहे.या कार्यक्रमास भावसार समाज व शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेले मान्यवर यांची उपस्थिती

# मराठवाड्यात पुढील चार दिवस मुसळधार

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून पावसाने चांगलीच उघडीप दिली आहे. पण, आता येत्या चार दिवसांत मराठवाड्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार, ११ जून रोजी नांदेड व हिंगोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वा-याचा वेग अधिक (ताशी ४० ते ५० कि. मी.) राहून मुसळधार पावसाची शक्यता आहे. धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यात १२ जून रोजी तर १३ जून रोजी धाराशिव, लातूर, नांदेड व बीड जिल्ह्यात, १४ जून रोजी बीड व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वा-याचा वेग अधिक (ताशी ५० ते ६० कि.मी.) राहून मुसळधार पावसाची शक्यता आहे.मराठवाडयात १० ते १२ जून रोजी काही ठिकाणी तर १३ व १४ जून रोजी ब-याच ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात पुढील तीन ते चार दिवसांत कमाल तापमानात हळूहळू २ ते ३ अं. से. ने घट होण्याची तर पुढील तीन ते चार दिवसांत किमान तापमानात फारशी तफावत जाणवणार नाही.विस्तारित अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाड्यात १३ ते १९ जून दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान सरासरीएवढे व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे.

# भाकप चे बीड जिल्हा अधिवेशन संपन्न

## कॉ. भाऊराव प्रभाळे यांची जिल्हा सचिव पदी एकमताने फेरनिवड

बीड (प्रतिनिधी) दिनांक १२ जून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे बीड जिल्हा त्रैवार्षिक अधिवेशन आज दिनांक १२ जून २०२५ रोजी बीड शहरातील हॉटेल नीलकमल येथे सुमारे १३७ प्रतिनिधी आणि भा क.प चे राज्य सचिव कॉ.सुभाष लांडे, राज्य सचिव मंडळ सदस्य कॉम्रेड नामदेव चव्हाण आदींच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी सर्वानुमते जिल्हा सचिव म्हणून कॉम्रेड भाऊराव प्रभाळे यांची फेरनिवड पुढील तीन वर्षासाठी करण्यात आली. याबाबत



अधिक असे की भारतीय कम्युनिस्ट पक्ष बीड अधिवेशन हॉटेल नीलकमल येथे संपन्न झालेल्या अधिवेशनात राज्यसचिव कॉ. सुभाष लांडे यांचे उद्घाटन पर भाषण झाले यावेळी बोलताना कॉ लांडे यांनी ग्रामीण, कष्टकरी, शेतकरी, मजूर वर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारच्या विरोधातील संघर्ष घट्ट करण्याचे आव्हान केले. यावेळी अनेक मान्यवरांनी पक्षाच्या राजकीय, संघटनात्मक आणि भविष्यातील चर्चा करण्यात आली अहवालामध्ये असलेल्या त्रुटी व दुरुस्ती सुचवल्या यावेळी अनेक राजकीय ठराव भविष्यकालीन कार्यक्रम ठरवण्यात आले. यावेळी ३५ सभासदांची नवीन जिल्हा कौन्सिल निवडण्यात आली. या अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातून अनेक प्रतिनिधी पक्ष सभासदांनी उपस्थिती लावली या वेळी कॉ. महादेव नागरगोजे, कॉ. नवनाथ रांजवण, कॉ. रंजना हुरकुडे, कॉ. ज्योतिराम हुरकुडे, कॉ. उत्तमराव सानप, डी जी तांदळे कॉ. उस्मान पठाण, ॲड भीमराव चव्हाण, पंकज चव्हाण, ॲड अंबादास आगे, कॉ. करुणा टाकसाळ, फिडेल चव्हाण, योगेश वाघमारे, जानवी हुरकुडे, सह अनेकांची उपस्थिती होती. जिल्हा सचिव म्हणून कॉम्रेड भाऊराव प्रभाळे यांची फेरनिवड करण्यात आली. सर्वांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

# क्या हुवा तेरा वादा? म्हणत शिवसैनिकांसह शेतकऱ्यांचे राष्ट्रीय महामार्गावर जनआदोलन जनसामान्यांची फसवणूक करणारे सरकार - उल्हास गिराम

बीड : (प्रतिनिधी) महायुती सरकार जन सामान्यांची फसवणूक करून सत्तेवर आले आहे. निवडणुकी पूर्वी जी आश्वासने दिली त्याला तिलांजली देऊन, हे फसवे सरकार स्थापन झाले आहे. या आघाडी सरकारला त्यांच्याच फसव्या घोषणाची आठवण करून देण्यासाठी आज विधानपरिषदे चे विरोधी पक्ष नेते आंबादासजी दानवे यांच्या आदेशानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिक व शेतकऱ्यांनी आज बीड शहर बायपास वरील महामार्गांवर रास्ता रोको आंदोलन केले.

शेतकऱ्यांना कर्ज मुक्त करून, शेतकरी सन्मान योजनेतून पंधरा हजार रुपये देण्याची घोषणा, लाडक्या बहिणींना पंधराशे ऐवजी एकविशे देणार, शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा देऊन प्रत्यक्ष खात्यावर नुकसान



भरपाई देणार, वृद्ध पेन्शन धारकांना एकवीसशे रुपये देणार होते, शेतीला चोवीस तास विज, हर घर जल - हर घर छत या सारख्या शेकडो फसव्या घोषणा करून सामान्य जनता, महिला, शेतकऱ्यांची दिशाभूल करून हे सरकार सत्तेवर आले.

या सरकारला त्यांच्याच घोषणाची जाणीव करून देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी शिवसैनिक, शेतकरी व महिलांना एकत्रित करत बीड शहर बायपास, महालक्ष्मी चौक या ठिकाणी राष्ट्रीय महामार्गांवर रास्ता रोको करून जन आंदोलन केले.

यावेळी महिला जिल्हा संघटक मीराताई नवले, सोपान काका मोरे तालुका प्रमुख शिरूर, मुकुंद शिंदे तालुकाप्रमुख पाटोदा, अजय दाभाडे बबलू दिवे तालुकाप्रमुख गेवराई,संजय महाद्वार ,हनुमान जगताप, सुशील पिंगळे, राजू मोहाले, रतन गुजर, दीपक बाप्पा मोरया, अशोक हिरडे, अशोक जाधव, कृष्णा चौरे, तात्या रोडे, पंकज कुटे, अजिंक्य डोरले, रवी वाघमारे, प्रदीप कोठुळे, नयुब पठाण, दादासाहेब सोनवणे, मशरू पठाण, महादेव परस्कार, अक्षय काशीद, राम अंतापुरकर, बाळू वैद्य, सतीश मस्के, रमेश सुरवसे, सखाराम कोरडे, मच्छिंद्र काळे, हनुमान काशीद, चंदूनाना कागदे, गोविंद शिंदे, विशाल पवार, बाळासाहेब लांडे, अशोक चव्हाण, विकास कदम, नितीन कुठे, शिंदे रावसाहेब, गणेश लोणकर, सतीश परदेशी, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर, नारायण काशीद, संतोष काशीद, बाळासाहेब, प्रतीक वाघमारे मारुती वाघचौरे, दाऊद शेख, शरद पवार, राजू गोपाळ, आदी शिवसैनिक उपस्थित होते

## संपादकीय

# निवडणुकांचे पडघम!

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या हालचालींना आता वेग आला असून त्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभागरचना करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. अ, ब, क वर्ग महानगरपालिकांची प्रभागरचना करण्याबाबतचे आदेश सरकारने दिले आहेत. यात पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, वसई, विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे. राज्यात गत तीन-चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. त्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका होणार आहेत त्या ठिकाणी प्रभागरचनेचे आदेश देण्यात आले आहेत. प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष लावायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार आहेत. त्यानुसार मु ंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एकसदस्यीय प्रभागरचना असेल. पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवी मु ंबई, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत. मुंबईत २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले. महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर पुन्हा २२७ प्रभाग करण्यात आले. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. परंतु आव्हान याचिका फेटाळण्यात आल्याने आता मुंबईमध्ये पुन्हा २२७ प्रभाग असणार आहेत. अ वर्ग महानगरपालिकांत पुणे, नागपूर; ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड ब वर्गात तर क वर्गात नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण डोंबिवली महानगरपालिकांचा समावेश आहे. ड वर्ग महापालिकांमध्ये अमरावती, अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सोलापूर, सांगली-मिरज-कुपवाड, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, जळगाव, नांदेड, धुळे, मालेगाव, लातूर, चंद्रपूर, परभणी, पनवेल, इचलकरंजी आणि जालना या महापालिकांचा समावेश आहे. ड वर्गातील महापालिकेत प्रभागरचना ठरवताना शक्यतो सर्वच प्रभाग चार सदस्यांचे करायचे आहेत. मात्र, सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा पाच सदस्यांचा होईल अथवा दोन प्रभाग तीन सदस्यांचे होतील. निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार नगरविकास विभागाने महापालिका, नगरपालिका तसेच नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी प्रभागरचना करण्याचे आदेश मंगळवारी जारी केले. राज्यातील ड वर्गातील १९ महापालिकांची प्रभागरचना करण्याचे आदेश जिल्हाधिका-यांना देण्यात आले आहेत. गत तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. आधी कोरोना आणि नंतर न्यायालयात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा लटकल्याने या निवडणुका खोळंबल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्य सरकारने ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये या निवडणुका घेण्याची तयारी सुरू केली. त्यानुसार राज्य सरकारने प्रभागरचनेचे आदेश दिले आहेत. या आदेशांचे पालन करताना नगरविकास विभागाने अ, ब, क वर्ग १० महापालिकांची प्रभागरचना करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिले आहेत, तर ड वर्ग १९ महापालिकांची प्रभागरचना करण्याचे आदेश जिल्हाधिका-यांना दिले आहेत. प्रभागरचनेसाठी साधारणपणे अडीच महिन्यांचा कालावधी लागणार असून त्यासाठी गुगल मॅपचा आधार घेण्यास सांगण्यात आले आहे. प्रभागरचना करताना महापालिका क्षेत्राची माहिती असणारा अधिकारी, प्रभागरचनेशी संबंधित नेमलेला अधिकारी, नगररचनाकार, संगणकतज्ज्ञ यांची महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त प्रारूप प्रभागरचना तयार करून राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेस सादर करतील. त्यानंतर राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्रभागरचनेस मान्यता देण्यात येईल.

# साक्षाळ पिंपरी ते नारायणगड जुना रस्ता झाला खुला : शेतकरी आणि भाविकांनी तहसीलदार शेळके यांचे मानले आभार

## -अनेक वर्षापासून चा प्रश्न मिटल्याने बळीराजा सुखावला





. बीड लोक इच्छा प्रतिनिधी महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताची निर्णय घेतले आहेत . बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना नियम ानुसार नागरिकांची शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत .

नव्यानेच पदभार घेतलेले विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी बुधवारी विभागातील सर्व जिल्हाधिकारी , अपर जिल्हाधिकारी यांची बैठक घेऊन सर्वसामान्य शेतकरी नागरिक यांची कामे तातडीने करण्याबाबत सूचना केल्या . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे . ३० मे रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी साक्षाळ पिंपरी गावात भेट दिली होती . यावेळेस त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर अभियानात विविध प्रमाणपत्रांचे वाटप करून शेतकऱ्यांनी त्यांच्या अडचणी बिनदिक्कतपणे सांगाव्या असे आवाहन केले होते . बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्ये इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे .

निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावी अशी सांगत असतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत . गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये , असा त्यांचा कटाक्ष असतो .

साक्षाळिपंपरी ते नारायणगड हा सुमारे ७० ते ७५ वर्षांपूर्वीचा जुना रस्ता गेली चार वर्ष पासून बंद होता . सदरचा रस्ता खुला करण्यासाठी मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके , ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप यांनी वारंवार प्रयत्न केला . परंतु त्यांना त्यामध्ये यश आले नाही . त्यामुळे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी गुरुवारी या ठिकाणास भेट दिली . त्यांच्या पुढाकाराने साक्षाळ पिंपरी ते नारायणगड हा सुमारे तीन किलोमीटर लांबीचा रस्ता खुला झाला . हा रस्ता गट नंबर ५७२ मध्ये अडवलेला होता . अंदाजे पाचशे मीटर रस्ता हा अत्यंत अरुंद होता . या ठिकाणी खोल पानंद असल्यामुळे चिखल होत होता . त्यामुळे शेतकऱ्यांना , भाविक , विद्यार्थी याना रस्त्याचा वापरच करता येत नव्हता . गावातील शेतकरी तसेच शेतमजूर , गावातील शेतकरी यांना शेतात शेतीविषयक अवजारे खते बी बियाणे नेण्यासाठी खूप मोठी अडचण निर्माण झालेली होती .

गावातील शेतकऱ्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना भेटून सदर रस्त्याची हकीकत सांगितली होती . हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असल्याने आणि सुमारे पाचशे शेतकऱ्यांसाठी सुद्धा हा रस्ता आवश्यक असल्याची खात्री पटल्यामुळे तहसीलदारांनी या ठिकाणी स्वतः भेट देण्याचे ठरविले . गुरुवार १२ जून रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अडवलेला पाचशे मीटर रस्ता ज्या शेतकऱ्यांनी अडवला आहे , त्यांना समक्ष जागेवर बोलावून गावकऱ्यासमोर समजावून सांगितले .

मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके यांनी शेतीसाठी रस्ता हा अत्यंत महत्त्वाचा असतो , शेतकऱ्यांच्या दळणवळणासाठी आणि एकंदरीतच विकासासाठी रस्ते होणे किती महत्त्वाचे आहे हे यावेळी समजावून सांगितले . शेतकरी , शाळेत जाणारे विद्यार्थी यांना जर असे चिखला पाण्यातून जावे लागत असेल तर यासारखी शरमेची बाब आपल्यासाठी असू शकत नाही , हे त्यांनी सर्वांना पटवून दिले .

त्यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सामोपचोराने ग्रामपंचायतचे कर्मचारी यांच्या मदतीने रस्त्याच्या खुणा करून मार्किंग करून दिली . हा रस्ता खुला करून देण्यात आला . दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांनी सुद्धा प्रशासनाला सहकार्य करत आम्ही तात्काळ जेसीबीच्या साह्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूस नाल्या करून जास्तीत जास्त रस्ता उंच करू , जेणेकरून येथे पुन्हा चिखल होऊ देणार नाही अशी हमी दिली .

सदरचा रस्ता खुला केल्याबद्दल गावचे सरपंच सौरभ नलावडे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे गावच्यावतीने आभार मानले . सदरचा रस्ता खुल्या केल्यामुळे या रस्त्याने सुम ारे ५०० शेतकऱ्यांची ये जा करण्याचा मार्ग खुला झाला आहे . हा रस्ता बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांची शेतीविषयक कामे तसेच शेतात खते बी बियाणे अवजारे जनावरे महिला पुरुष यांना पूर्वी तीन किलोमीटर दूरून जावे लागत होते . रस्ता खुला झाल्यामुळे हे अंतर वाचणार आहे व परिश्रम वाचणार आहेत . हा रस्ता खुला करतेवेळी गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते . त्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे जागेवर येऊन गेली चार वर्षे बंद असलेला रस्ता खुला केल्याबद्दल महसूल प्रशासनाचे आभार मानले .

हा रस्ता खुला करतेवेळी पारगाव सिरसच्या मंडळ अधिकारी स्मि ता गुंजाळ - शेळके , तलाठी यशवंत सानप , ग्रामसेवक भास्कर भस्मारे , सरपंच सौरभ नलावडे , उपसरपंच पार्वती काशीद , माजी जिल्हा परिषद सदस्य नारायण काशीद , संपत काशीद , सखाराम काशीद , विक्रम काशीद , लक्ष्मण काशीद , अर्जुन काशीद , बाबुराव काशीद , बापूराव काशीद , प्रकाश काशीद , भागवत काशीद , नारायण सुपेकर , बाळू काशीद विकास काशीद , गणेश काशीद उपस्थित होते .

# महादुर्गावर जागर प्रतिष्ठान कडून राज्यभिषेक सोहळा उत्साहात साजरा

किल्ले धारूर । प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक शहर असणाऱ्या धारूर येथील महादुर्ग गडावर जागर प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा राज्याभिषेक सोहळा मोठा उत्साह साजरा करण्यात आला दोन दिवसाचे भव्य असे नियोजन या सोहळ्यात करण्यात आले होते राज्याभिषेकांच्या पूर्वसंध्येला रात्री मावळ्यांच्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारे मर्दानी खेळ आणि महाराष्ट्र ाचे कुलस्वामिनी आई तुळजाभवानी गोंधळाच्या आयोजन करण्यात आले होते व तसेच ९ जून सकाळी आठ वाजता टाळा मृदु ंगाच्या गजरात भव्य पालखी सोहळा संपन्न झाला त्यानंतर गडाच्या मुख्य दरवाजाला तोरण बांधून कार्यक्रमाला सुरुवात झाली विविध जाती तील ११ जोडप्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्यात आला, राज्याभिषेकासाठी सात किल्ल्यांवरील माती, प्रयागराज येथील महा कु ंभाचे पवित्र जल, छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सात गडावरील पाणी, ३५२ नाणी आणि विविध साहित्यांनी मंत्रोच्चाराच्या सुमधुरतेने राज्याभिषेक करण्यात आला, गडावरील संपन्न वातावरणाने सोहळ्याला अनोखी शोभा आली कार्यक्रमाच्या सुरुवातीला वैष्णवी काळे यांचे सुमधुर असे गीत गायन झाले . या कार्यक्रमाला जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर, छावा क्रांतिवीर संघटनेचे अध्यक्ष करण भाऊ गायकर तसेच सामाजिक राजकीय शैक्षणिक कृषी इत्यादी क्षेत्रातील नामवंत मान्यवर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित होते, तसेच प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.अशोक बांगर यांचे अभ्यासपूर्ण भाषण संपन्न झाले. गेल्या दोन वर्षापासून जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य ही संघटना धारूरच्या किल्ल्यामध्ये राज्याभिषेक सोहळा साजरा करत आहे तसेच गेल्या पाच वर्षापासून दीपोत्सव सोहळा साजरा करत आहे येणाऱ्या काळातही संघटना ताकतीने सोहळा साजरा करणार गडकिल्ले संवर्धनाच्या हा विचार जागर प्रतिष्ठान कायम पेरीत राहील असे किसन पाटील यांनी संबोधल

# बच्चू कडूंच्या मागण्या मान्य करा; खा.बजरंग सोनवणेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

बीड । प्रतिनिधी शेतकऱ्यांसह दिव्यांग आणि विधवा महिलांच्या प्रश्नांवरुन प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलनाचे शस्त्र उगरले आहे. दरम्यान त्यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा आजचा चौथा दिवस असून त्यांच्या मागण्या मान्य करा, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना पाठविले आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू ंचे दि.८ जून पासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मोझारी येथील समाधी स्थळासमोर विविध मागण मंजूर करण्यासाठी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे. बुधवारी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी बच्चू कडू ंना फोनवरून संपर्क साधत संवाद साधला. यावेळी शरद पवार यांनी बच्चू कडूंना प्रकृती जपण्याचा वडीलकीचा सल्ला देखील दिलाय. दरम्यान, बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना पत्र लिहून माजी मंत्री बच्चू कडू यांच्या मागण्या मान्य कराव्यात, असे पत्र मुख्यमंत्री यांना पाठविले आहे. बच्चू कडूंच्या आंदोलनातील १७ प्रमुख मागण्या असून यात शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, दिव्यांग व विधवा महिलांना ६ हजार रूपये मानधन देण्यात यावे, आपत्कालीन संकटमुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफ करून देण्यात यावे, तसेच शेतमालाला हमीभाव (किमान दर) वर २० टक्के अनुदान देण्यात यावे. दि.६ एप्रिल २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिबृत्तानुसार शासन निर्णय काढण्यात यावे. वंचित घटकांना वगळता सर्व गोरगरीब समांतर राहणाऱ्या व सन्मानजनक वागणूक हवी असलेल्या व सध्या विविध अडचणीत असलेल्या घटकांनाही सन्मानजनक घरकुल द्यावे. शहरासारख्या ग्रामीण भागातील घरकुलासाठीही समान निकष लागू करून किमान ५ लाख अनुदान घरकुल लाभार्थ्यांना देण्यात यावे, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना




स्वतंत्र मंडळ स्थापून १० लाख आर्थिक मदत व संपूर्ण कर्जमाफी द्यावी, दररोज होणाऱ्या श्रमाच्या बदल्यात १००० मजुरी दिली जावी, संजय गांधी योजनेत पात्र लाभार्थ्यांना तात्काळ संपूर्ण मंजूर रक्कम देण्यात यावी. शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना स्वतंत्र शिष्यवृत्ती योजना लागू करून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती द्यावी. १०० टक्के दिव्यांग व अपंग व्यक्तींना शासकीय नोकरीत ५ टक्के आरक्षण देण्यात यावे. शेतमाल विमा योजनेचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर द्यावा, विमा हप्तयाचे ५० टक्के पेक्षा जास्त शुल्क शासनाने द्यावेख शेतकऱ्यांना खत, बियाणे विनाशुल्क द्यावे, शेतीसाठी लागणाऱ्या वीजेचे बील माफ करून सतत वीजपुरवठा करण्यात यावा. शेतमालास हमी भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. शासकीय खरेदी केंद्रावर हमीभावाने शेतमालाची खरेदी करावी, अशा मागण्या आहेत.

# गेवराईत श्री स्वामी समर्थ पादुका पालखीचे जल्लोषात स्वागत श्री स्वामी समर्थांच्या जयघोषाने परिसरात भक्तिमय वातावरण




गेवराई : अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या श्री स्वामी समर्थ महाराज पादुका पालखीचे मंगळवार दि.१० जुन रोजी सायंकाळी गेवराईत शहरात आगमन झाले यावेळी स्वामी भक्तांच्या वतीने वाणी मंगल कार्यालयात पालखीचे जल्लोषात स्वागत करुन अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त, सद्गुरू श्री स्वामी समर्थ की जय असा जयघोष करण्यात आला. यावेळी श्रींची महाआरती व तदनंतर भाविकांनी श्री स्वामी समर्थ पादुका पालखीचे दर्शन घेवून महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट द्वारा आयोजित श्री स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट पालखीचे गेवराई शहरात मंगळवार दि.१० जून २०२५ रोजी सायं ०५:३० वाजता आगमन झाले. स्वामी भक्तांनी पालखीचे जल्लोषात स्वागत करुन श्रींची महाआरती व तदनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. बुधवारी पहाटे भाविकांच्या हस्ते अभिषेकानंतर पालखीचे पाथर्डीकडे प्रस्थान झाले. सेवेला संदीप राजगुरु , राजेंद्र सिकची, अविनाश कुलकर्णी, , संदीप सिकची, सुधीर जोशी, अनंता वडघणे, श्रीपाद रामदासी, गोपाल लखोटिया व श्री स्वामी समर्थ भक्तगण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंथरवन पिंपरी ग्रा.पं. व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने पर्यावरण दिन व शिवराज्याभिषेक दिन वृक्षारोपण करून साजरा

## वामा" चित्रपट अभिनेते महेश कुमार वनवे यांची ही प्रमुख उपस्थिती..



बीड दिनांक 6 जून रोजी शिवराज्याभिषेक दिन व काल झालेला जागतिक पर्यावरण दिन या दोन्हींचे औचित्य साधून अंथरवन पिंपरी येथे ठीक सकाळी नऊ वाजता शिवराज्याभिषेक ध्वजारोहण करून वंदन करण्यात आले. याच निमित्ताने ग्रामपंचायत व बीड शहर बचाव मंच यांच्या यांच्या संयुक्त सहयोगातून वृक्षावरोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. बीड शहर बचाव मंचाच्या वतीने 200 झाडे देण्यात आलेली आहेत व येत्या काळामध्ये ग्रामपंचायत 1000 झाडे लावण्याचा उपक्रम लवकरच पूर्ण करील असा निर्धार व्यक्त करण्यात आला.

नुकतेच लोकमत समूहाच्या वतीने अंथरवण पिंपरी ग्रामपंचायतीला सरपंच ऑफ इयर 2025 हा पुरस्कार देण्यात आला आहे. गावच्या सरपंच सौ. शिवगंगा ताई भाऊराव प्रभाळे या दाम्पत्यांनी गावांमध्ये फार छान कौतुकास्पद विकास कामे राबवली आहेत व अक्षरशः गावाचा कायापालट केला आहे. गावामध्ये सगळीकडे गल्लोगल्ली सिमेंट रस्ते व पेवर ब्लॉक रस्ते केले आहेत. गावामध्ये अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येत आहेत. ग्रामस्थांच्या सर्व अडीअडचणींना प्रभाळे दांपत्य अहोरात्र उभे असते. गावामध्ये वृक्षारोपण करून गावाला हिरवे नंदनवन करण्याचीअग्रणी भूमिका भाऊराव प्रभाळे यांनी घेतली आहे. आजच्या या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला वामा" चित्रपटाचे प्रसिद्ध अभिनेते महेशकुमार वनवे यांची बीड शहर बचाव मंचाच्या वतीने प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी ग्लोबल वॉर्मिंग हे जगावर आलेले मोठे संकट आहे अशी चिंता व्यक्त केली. यातून वाचण्यासाठी व पुढच्या पिढीला दुष्काळासारख्या मोठ्या नैसर्गिक संकटांपासून वाचण्यासाठी गावोगाव वृक्षारोपन केले जावे हाच एक पर्याय शिल्लक आहे असे मत व्यक्त केले. या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला बीड शहर बचाव मंचाच्या व ग्रामपंचायत च्या वतीने नितीनजी जायभाये, सरपंच सौ शिवगंगा ताई व भाऊराव प्रभाळे, ह.भ.प. नवनाथ महाराज हरको बाबा संस्थान, अभिनेते डॉ. ॅड.महेशकुमार वनवे, वनवे काका, पंचायत समितीचे वि.अ. कल्याणराव शेळके साहेब, ग्रामसेवक सौ.ज्योतीताई लेकुरवाळे, सुधीर देशमुख,उपसरपंच अशोक शिंदे, सदस्य अशोक शिंदे, संतोष शिंदे, दिलीप शिंदे, संग्राम वाघमारे, खाजा शेख, ॅड.नितीनजी वाघमारे, रामधन जमाले, ॅड. प्रेरणाताई सूर्यवंशी, सौ. लताताई राऊत, बाजीराव ढाकणे, डॉ.संजय तांदळे, अशोकराव येडे, किशकिन्दाताई ताई पांचाळ, माऊली शिंदे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# जिल्ह्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ सादर करा - पालकमंत्री अतुल सावे

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणात पाऊस होत आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकासह पशु, कच्चा घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याबाबत पालकमंत्री अतुल सावे यांनी सर्व परिस्थितीची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्याकडून घेतली व जिल्ह्यात झालेल्या या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून शासनास अहवाल सादर करावा, अशी सूचना केली.अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावर निर्णय घेऊन नुकसानग्रस्तांना त्वरीत मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले. नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस झालेल्या मंडळामध्ये कंधार तालुक्यात कंधार मंडळात 85.75 मिमी, कुरूळा 86.00, फुलवळ 68.75, उस्माननगर 81.75, लोहा तालुक्यात लोहा, सोनखेड व कलंबर मंडळात प्रत्येकी 81.75 तर किनवट तालुक्यात जलधरा 72.75, शिवनी मंडळात 69.25 मि.मी. एवढ्या पाऊसाची नोंद झाली आहे.

# लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था शाखा उरुळी कांचनचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न

लोकमंगल ही एक संस्था किंवा एक समूह नाही तर सामाजिक चळवळ म्हणून कार्य करत आहे. सभासद यांनी लोकमंगल पतसंस्थेवर टाकलेल्या विश्वावासामुळे आज लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेचे कामकाज प्रगतीपथावर चालू आहे. वर्षभरात अनेक स्तुत्य विधायक समाजोपयोगी उपक्रम प्रत्येक शाखेत राबविले जातात. सभासद बांधवांच्या व महिलांच्या साठी अनेक योजना राबविल्या जातात आपण त्यांचा लाभ आवश्यक घेतला पाहिजे. लोकमंगलच्या सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक कार्याची माहिती लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक शिवाजी माळी यांनी दिली. शाखा उरुळी कांचन लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सल्लागार तथा जेष्ठ समाजसेवक हभप डॉ रविंद्र भोळे उपस्थित होते. तसेच पुणे विभागीय अधिकारी कमलाकर पाटील, उरुळी कांचनचे शाखाधिकारी अभिजीत साखरे, लोणी काळभोर शाखेचे शाखाधिकारी मारुती चौगुले, गुलटेकडी शाखेच्या शाखाधिकारी लक्ष्मी माळी, सासवडच्या शाखाधिकारी स्वाती बोरकर, पत्रकार सुनिल तुपे, सल्लागार नंदकुमार मुरकुटे, अशोक कदम, परिघा कांचन, शुभांगी परिट, अक्षदा कांचन, अलका मदने, संस्थेचे कर्मचारी मयुरी बोडके, सोनाली वाले, अनिकेत जगताप, महेश फुलझळके, सभासद ताराचंद तलरेजा, कर्मचारी वृंद, सभासद, सल्लागार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संचालक शिवाजी माळी यांनी केले तर सूत्रसंचालन अमोल भोसले यांनी केले आभार शाखाधिकारी अभिजीत साखरे यांनी मानले.

# खाजगी संस्थांच्या दावणीला बांधलेल्या जिल्हा प्रशासनामुळे नांदुरघाटची जि.प. शाळा वाचवण्यासाठी

## अमोल जाधववर आत्मदहनाचा इशारा देण्याची वेळ यावी हि लाजिरवाणी बाब :- डॉ.गणेश ढवळे



### एकीकडे पटसंख्या वाढवणा-या शाळांचा गौरव आणि दुसरीकडे नांदुरघाट सारख्या शाळा बंद पाडणार..हा शिक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासनाचा दुटप्पीपणा :- डॉ.गणेश ढवळे

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जनजागृती करावी,पालकांशी संपर्क करावा, सर्वेक्षण, अंगणवाडी,गृहभेटीतुन जनजागृतीचे उपक्रम राबवुन पटसंख्या किमान १५ ते २५ टक्के जास्त वाढविण्याचे निर्देश शिक्षण आयुक्तांनी दिले आहेत.सर्वात जास्त पटनोंदणी केलेल्या शाळांचा गौरव करण्यात येणार आहे आणि दुसरीकडे नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्नशील ग्रामस्थांची अडवणूक केली जात असुन असा दुजाभाव का?? त्यासाठी अमोल जाधव अध्यक्ष शालेय शिक्षण समिती यांच्यावर आत्मदहनाची वेळ यावी हा ढोंगीपणा नाही का?? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

### नांदरघाट जिल्हा परिषद शाळेसाठी नांदुरघाट ग्रामस्थांचे कौतुकास्पद उपक्रम

नांदुरघाट येथील जिल्हा परिषद शाळा वाचविण्यासाठी नांदुरघाट ग्रामस्थांचा लढा गेल्या १८ महिन्यांपासून सुरू असुन जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टी, नळपट्टी आदी ग्रामपंचायतने करमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.तसेच शाळेत सीसीटीव्ही, शैक्षणिक साहित्य आणि पटसंख्या भरपूर असुन विद्यार्थ्यांना उत्तेजन देणारे उपक्रम राबविण्यात येत असुन गुणवत्तापूर्ण विद्यार्थी आहेत. शाळेमध्ये सर्वांगीण विकासासाठी नांदुरघाट ग्रामसथ मोलाचे योगदान देत आहेत.

बीड:- ( दि.११ ) एकीकडे येत्या शैक्षणिक वर्षापासून पहीलीपासुन विद्यार्थ्यांना सीबीएसई पॅटर्न राबविण्यात येणार आहे त्यामुळे गावच्या मुलांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे न जाता गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घ्यावे यासाठी २५% पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट शासनाने दिले असून त्यासाठी आवश्यक सूचना दिलेल्या आहेत.जिल्हापरीषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जुनच्या पहिल्या आठवड्यापासून कामाला लागण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. मात्र याचवेळी केज तालुक्यातील नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेची शाळा वाचवण्यासाठी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अमोल सखाराम जाधव यांनी शिक्षण विभाग व जिल्हा प्रशासन सहकार्य न करता खाजगी संस्था चालकांचे हित जोपासत अडथळे निर्माण करत असल्याने दि.१४ जुन रोजी शाळेच्या प्रांगणात आत्मदहनाचा इशारा जिल्हा प्रशासनाला दिला आहे. अमोल जाधव यांच्या न्याय मागण्या मान्य करून त्यांना आत्मदहनापासुन परावृत्त करण्यात यावे हि शासन आणि प्रशासनासाठी लाजीरवाणी बाब असल्याचे म्हणत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड, शिक्षणमंत्री, विभागीय आयुक्त यांना जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

# माहेरच्यांना बोलावून पतीचं केलं अपहरण अन मोडले हात-पाय !

एकीकडे सासरच्यांच्या छळाला कंटाळून सूना आत्महत्या करण्याच्या बातम्या सातत्याने कानावर पडत असताना बीडमध्ये मात्र या उलट प्रकार घलला. पती पत्नीचा वाद विकोपाला केला आणि नंतर पत्नीने माहेरच्या मंडळींना बोलावून पतीला बेदम चोपलं. त्यामध्ये पतीचा दोन्ही पाय आणि हात मोडले. रामहरी मोरे असं पतीचं नाव असून अनुसया काकडे असं पत्नीचं नाव आहे. याप्रकरणी बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात पत्नीसह चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीडच्या ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीत ही घटना घडली आहे. पत्नीने माहेरच्या मंडळींना बोलावून पतीचे अपहरण केले आणि त्याला बेदम मारहाण केली. या मारहाणीत पतीचे दोन्ही पाय आणि एक हात फ्रॅक्चर झाला. रामहरी मोरे याचा विवाह मागील वर्षी अनुसया काकडे हिच्यासोबत झाला होता. परंतु घरगुती कारणावरून दोघांचे सातत्याने भांडण होत होते. त्यामुळे हे पती-पत्नी विभक्त राहत होते. अशातच रामहरी मोरे आपले सामान घेण्यासाठी पत्नीच्या घरी गेला असता या दोघांचे पुन्हा भांडण झाले. भांडणाचा वाद विकोपाला जात असल्याचे लक्षात येताच रामहरी मोरे यांनी घरातून काढता पाय घेतला आणि ते आपल्या गावी निघाले. मात्र त्याच वेळी पत्नीने तिच्या माहेरच्यांना बोलावून घेतलं. तिच्या माहेरच्या मंडळींनी रामहरी मोरेचे रस्त्यावरुन अपहरण केलं आणि त्याला बेदम मारहाण केली.या मारहाणीत रामहरी मोरे याचे दोन्ही पाय आणि उजवा हात मोडला. या मारहाणीत रामहरी मोरे हा जबर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांना या प्रकाराची माहिती मिळताच त्यांनी तातडीने पत्नी आणि तिच्या माहेरच्या मंडळींवर गुन्हा दाखल केला आहे.

# बीड नगरपालिकेने मुक्या जनावरांचा कोंडवाडा बंद करुन गो शाळेत आम्ही जनावर पाठवतो म्हणून खटकाच्यायाच्या ताब्यात देऊन कुठला पुरुषार्थ साध्य केला आणि केलेले पाप नगरपालिका कुठे फेडणार

## तब्बल बीड शहरात ५० मुक्या जनावरांचे मुंडके आले आढळून नवनाथ अण्णा शिराळे पाटील

बीड लोक इच्छा प्रतिनिधी

बीड शहरामध्ये नगरपालिकेच्या वतीने खासबाग लेडी रोड बीड येथे जनावरांसाठी कोंडवाडा चालू होता तो कोंढवाडा अचानकपणे बंद नगरपालिकेने करून मुक्या जनावरांना खाटकाच्या दावणीला बांधण्याचे विडे उचलले आहेत का काय अशा प्रकारचा प्रश्न सध्या बीड शहरातील नागरिकांना पडला आहे बीड शहरातील स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये ५० मुक्या जनावरांचे मुंडके आढळून आल्याचे वृत्त बीड शहरांमध्ये वर्तमान पत्राच्या माध्यमातून माध्यमातून पसरताच अनेक बीड शहरातील नागरिकांमधून संतापाची लाट निर्माण झाली आहे देशामध्ये नरेंद्रभाई मोदीचे सरकार आहे आणि राज्यांमध्ये देवेंद्र भाऊ यांचे सरकार आहे परंतु बीड शहरांमध्ये अंधारे मॅडम यांचे अंधाराचे राज्य कायम आहे हे बीडकरांसाठी दुर्दैव आहे नगरपालिकेच्या वतीने जनावरांसाठी कोंडवाडा आहे त्यांच्यासाठी चाऱ्याची देखील व्यवस्था नगर प्रशासनाच्या वतीने करण्यात येते परंतु कोंडवाडा बंद करून आणि चारा जनावरांचा बंद करून नेमका नगरपालिकेने कुठला पुरुषार्थ साध्य केला आहे आणि असे निष्पाप मुक्या जनावरांचे प्राण कुठपर्यंत नगरपालिका घेऊन याचे पाप कुठे फेडणार हा देखील प्रश्न आता बीड शहरातील तमाम नागरिकांना पडला असल्याचे बीड नगरपालिकेचे माजी सभापती तथा भाजपाचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे बीड शहरामध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे मुख्य जनावरे बिचारे रस्त्याने फिरत आहेत अचानकपणे गोभक्तांच्या गाडीच्या समोर ते येऊन आम्ही नेमके आता जायचे कुठे असा प्रश्न देखील आता गोभक्तांना मुके जनावरे विचारत आहेत याच पार्श्वभूमीवर नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे बीड शहरातून प्रवास करत असताना त्यांच्या गाडीच्या समोर एक गोमाता येऊन उभा राहिले आणि आपल्या व्यथा अण्णांच्या समोर मांडू लागली हा प्रसंग प्रत्यक्षात बिडकरांना पहावयास मिळाला म्हणून आता गोम तेचे रक्षण होण्यासाठी गोवंशाचे रक्षण होण्यासाठी भाजपाचे नेते नवनाथांना शिरोळे पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री नामदार श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्याकडे देखील फॅक्स द्वारे तक्रार केली आहे आणि बीड शहरातील बिघडलेली नगर प्रशासनाचे घडी पूर्वपदावर आणण्यासाठी आपण सातत्याने शासन प्रशासन दरबारी आम




चे नेत्या आदरणीय पंकजाताई मुंडे ताई साहेबांच्या माध्यमातून आवाज उठव व झोपलेले नगर प्रशासन हे जागे केल्याशिवाय आता आम्ही स्वस्त बसणार नसल्याचेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे आंधरे मॅडम सीओ यांना स्थानिक राजकीय नेत्यांनी देखील फोन केले तर त्यांचा देखील फोन अंधारे मॅडम उचलत नाहीत एवढा मगरूळपणा बरोबर नाही अंधारे मॅडम उघडा डोळे आणि बघा नीट बीड शहरामध्ये नेमके चालले आहे काय कमीत कमी गोवंशासाठी तरी आपले नगर प्रशासन जागे करा आणि बीड शहरांमध्ये गल्लीबोळामध्ये गोवंश चोरण्यासाठी येणारी कसाई याची टोळी पकडून त्यांना जेरबंद करून जेलची हवा दाखवा व बीड शहरामध्ये प्रत्येक गल्लीबोळामध्ये फिरणाऱ्या गाई आणि वासरे हे बीड नगरपालिकेच्या वतीने कोंडवाडा चालू करून त्यांना त्या ठिकाणी ठेवा आणि या होणाऱ्या गोहत्या बंद करा आणि त्यांची पूर्ण व्यवस्था करा अन्यथा बीड शहरातील तमाम नागरिक आपल्याला स्वस्थ बसू देणार नाहीत याची देखील आपण दक्षता घ्यावी असे देखील प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवण्यात आले आहे एवढ्या मोठ्या ५० गो वंशाचे मुंडक्यामुळे बीड शहरातील तमाम नागरिकांमध्ये नगर प्रशासनाच्या व सी ओ नीता अंधारे मॅडम यांच्या अंधाराच्या कार्यामुळे नाराजी व्यक्त होत आहे आता तरी जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालावे आणि पंकजाताई मुंडे पशुसंवर्धन मंत्री या मुक्या जनावरांच्या बाबतीत तात्काळ दखल घेतील आणि या दोषी नगर प्रशासनावर कारवाई करतील असी अपेक्षा ही बीड शहरातील नागरिकांम धून व्यक्त होत आहे.

# फक्त ३० सेकंदात:विमान अपघाताच्या एकमेव साक्षीदाराने सगळ सांगितल

अहमदाबाद येथे 242 प्रवासी असलेलं प्रवासी वाहतूक विमान कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेचे एनेक व्हिडीओ आता समोर आले आहेत. हवेत उड्डाण घेतल्यानंतर पुढच्याच काही सेकंदात हे विमान थेट एका इमारतीवर आदळलं. या दुर्घटनेत मोठी जीवितहानी झाली आहे. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हेदेखील होते. दरम्यान, या दुर्घटनेत फक्त एक प्रवासी वगळता अन्य सर्वांचाच मृत्यू झाला आहे. या प्रवाशाने विमानात नेमकं काय घडलं? याबाबत माहिती दिली आहे. एकमेव प्रवासी वाचला मिळालेल्या माहितीनुसार एअर इंडियाचे B-787 विमान आपल्या फ्लाईट AI-171 दरम्यान अहमदाबादहून लंडनला जाणार होते. त्यासाठी या विमानाने नियोजित वेळेनुसार उड्डाण घेतले होते. मात्र काही तांत्रिक बिघाडामुळे हे विमान हवेतून थेट एका इमारतीवर आदळले. या दुर्घटनेत एकूण 242 पैकी 241 प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यात फक्त एक प्रवासी सुदैवाने वाचला आहे. या प्रवाशाचे



नाव रमेश विश्वकुमार असे आहे. रमेश यांनीच विमानात नेमकं काय घडलं? याबाबत माहिती दिली आहे. रमेश यांनी सांगितलं विमानात नेमकं काय घडलं?

रमेश विश्वकुमार या अपघातातून वाचले आहेत. विशेष म्हणजे भिंतीवर आदळल्यानंतर अपघातग्रस्त विमानाचा चक्काचूर झाला होता. विमानाला मोठी आग लागली होती. तरीदेखील रमेश विश्वकुमार या अपघातातून बचावले. त्यांना फार काही इजा झाली नाही. अपघातानंतर ते चालत-चालत बाहेर आले. त्यांच्या अंगावर काही जखमा होत्या. पण ते बोलू शकत होते. त्यांनीच सांगितल्यानुसार विमानाने उड्डाण घेतल्यानंतर अवघ्या तीस सेकंदांत या विमान कोसळलं. मात्र त्याआधी विमानात स्फोट झाला होता, अशी माहिती त्यांनी दिली. रमेश विश्वकुमार यांच्यावर उपचार चालू दरम्यान, रमेश विश्वकुमार यांच्यावर बीजे वैद्यकीय महाविद्यालयात उपचार चालू आहे. तर उर्वरित मृत प्रवाशांची ओळख पटवण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांना डीएनए सॅम्पल देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तर ज्या वसतीगृहावर हे विमान आदळले होते, तेथील विद्यार्थ्यांवरही सध्या उपचार करण्यात येत आहेत.

## वारकऱ्यांच्या स्वागतासाठी बीड प्रशासन सज्ज

बीड : आषाढी एकादशीनिमित्त बीड जिल्हामार्गे पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या विविध पालखी सोहळे, दिंड्यांतील वारकऱ्यांची काळजी घेण्याचे नियोजन यंदा प्रशासनही करणार आहे. वारकऱ्यांना पाणी, आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी पोलिस बंदोबस्ताचे नियोजन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात तयारीची बैठक झाली. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, आरोग्य व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, पोलिस अधिकारी, पालखीप्रमुख आदी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या बैठकीत सहभागी होते. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रास्ताविक केले. जिल्ह्यात आलेल्या पालख्या व दिंड्यांच्या मुक्कामी स्वच्छता, पाणी, स्वच्छतागृह, वीज अशा सुविधांबाबत प्रशासन लक्ष घालणार आहे. यासह पालख्यांचे आगमन ते प्रस्थानादरम्यान आरोग्य सुविधा, स्वच्छता, रुग्णवाहिका, डॉक्टर, औषधे, रुग्णालयांची यादीही तयार करण्यात आली आहे. कायदा सुव्यवस्थेबाबतदेखील नियोजन करण्यात आले आहे. पालखी मार्गावर आणि मुक्काम ठिकाणी चोख बंदोबस्तासह वाहतूक नियोजन, स्वतंत्र पार्किंग अशा सोयी करण्याचे नियोजन या बैठकीत करण्यात आले. दिंडी मार्गावरील रस्त्यांची डागडु जी, पथदिव्यांची दुरुस्ती, अग्निशमन वाहने सज्ज ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. सर्प, विंचू, श्वान दंशावरील औषधांचा साठा तयार ठेवण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले आहेत.संत एकनाथ महाराज पालखी (पैठण-पंढरपूर) ही शिरूर कासार तालुक्यातून जाते. तिचा शिरूर कासारमध्ये मुक्काम असतो. श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर (कौंडण्यपूर-पंढरपूर),




संत गजानन महाराज संस्थान, शेगाव (जि. बुलडाणा) ही पालखी परळी व अंबाजोगाई तसेच केज तालुक्यातून पंढरपूरकडे जाते. संत मुक्ताबाईंची पालखी बीडमधून जाते. या पालखीचा गेवराई, नामलगाव, बीड, श्रीक्षेत्र कपिलधार, चौसाळा आदी ठिकाणी मुक्काम असतो. आषाढी एकादशीची वारीनंतर पंढरपूरहून शेगावकडे जाताना संत गजानन महाराजांची पालखीदेखील पुन्हा चौसाळा, श्रीक्षेत्र कपिलधार व बीड शहरात मुक्कामी असते. पालखी सोहळे, दिंड्यांतील वारकऱ्यांच्या सोयीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून, सर्व विभागांना त्यांच्या अनुषंगिक बाबी तयार ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. वारकरी, भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा चांगल्या प्रकारे मिळाव्यात यासाठी प्रयत्न आहेत

## केज तालुक्यातील अल्पवयीन मुलीचे अपहरण

केज : आठवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली अल्पवयीन मुलगी काही कामानिमित्त घराबाहेर गेली होती, ती परत आलीच नाही. अज्ञात व्यक्तीने फूस लावून तिचे अपहरण केल्याचा संशय कुटुंबातील सदस्यांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरोधात युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात एक अल्पवयीन मुलगी रविवारी (दि.८) काही कामानिमित्त घराबाहेर गेली होती, ती परत आलीच नाही. यादरम्यान एका अज्ञात व्यक्तीने फूस असा संशय तिच्या कुटुंबियांनी व्यक्त के ला आहे. आई-वडिलांनी परिसरासह तिच्या मैत्रिणींकडे व नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला. मात्र, ती मिळून आली नाही.



याप्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्धात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे हे करीत आहेत

## ॲट्रॉसिटी ॲक्ट मधील आरोपी पोलिसांना सापडेनात

बीड शहरातील पालवण रोड या ठिकाणी हॉटेलवर धुडूस घालून मारहाण करत जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या विरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये पुन्हा दाखल झालेला असताना या घटनेतील आरोपी ग्रामीण पोलिसांनी अद्यापही अटक केली नसून सदर आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी फिर्यादी अविनाश का साबळे यांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. अविनाश अनुराथ साबळे राहणार पालवन तालुका बीड यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मला व माझा भाऊ नितीन साबळे याला आरोपी अक्षय साखरे संदीप दहिफळे शनी शिंदे रस्ते व इतरांनी २६ जून रोजी रात्री साडेनऊ ते दहाच्या दरम्यान हॉटेल शिवमुद्रावर असताना मारहाण करून जातीवाचक स्वीकार केली त्यासोबतच तुला हॉटेल चालवायची लायकी नाही तुला उभे चिरून टाकू अशी जीवे मारण्याची धमकी दिली याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला आहे दिनांक २५ रोजी हा गुन्हा दाखल झाला होता यातील केवळ एका आरोपीला पोलिसांनी पकडले असून तीन ते चार आरोपी अद्यापही फरार आहेत पोलिसांच्या आशीर्वादाने ते शहरातच फिरत असल्याचेही म्हटले असून बीड पोलिसांनी या आरोपींना तात्काळ अटक करावी अशी मागणी अविनाश साबळे यांनी निवेदनात केली आहे.

## जालन्यात ३४ कोटीच्या अपहरानंतर मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील अतिवृष्टी अनुदान चौकशीचे आदेश

बीड । प्रतिनिधी जालना जिल्ह्यात अतिवृष्टी अनुदानाच्या ३४ कोटी ९७ लाखाच्या अपहाराचं प्रकरण समोर आल्यानंतर मोठ निर्णय घेण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटपाची आता संपूर्ण मराठवाड्यामध्ये चौकशी होणार असून, यासाठी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्व प्रत्येक जिल्ह्यामध्ये चौकशी पथक नेमण्याचे आदेश संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी दिले आहेत. विशेष म्हणजे गेल्या पाच वर्षांमध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या अनुदान वाटपाची हे जिल्हानिहाय पथक चौकशी करणार असून यात शेतकरी नसलेले व्यक्ती,



सरकारी अथवा अकृषक जमिनीवर शेती दाखवून किंवा डबल अनुदान लाटले आहे का याची चौकशी केली जाणार आहे. जालना जिल्ह्यातील अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यानंतर विभागीय आयुक्तांचे मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात अतिवृष्टी अनुदानाची चौकशी करण्यासाठी सुधारित आदेश जारी करण्यात आला आहेयमराठवाड्यात जिल्हा निहाय अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी पथककडून चौकशी केली जाईल. संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी याबाबत सुधारित आदेश जारी केले आहेत. नुकसानग्रस्त शेतक यांसाठी मंजूर झालेले अनुदान त्यांच्याच खात्यात जमा झाले किंवा कसे याची शहानिशा या पथकाकडू न केली जाणार आहे. मागील ५ वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे वाटप झालेल्या अनुदानाची चौकशी होणार आहे. या चौकशीत शेतकरी नसलेले व्यक्ती, शासकीय तसेच अकृषक जमिनीवर शेती दाखवून अनुदान वितरीत केलेले व्यक्ती, एका पेक्षा अधिक वेळा अनुदान वितरीत केलेले व्यक्ती इत्यादींना अनुदान वितरीत झाले का याची चौकशी जिल्हा निहाय नियुक्त पथक चौकशी करणार आहे.अतिवृष्टी अनुदान वाटपाची मराठवाड्यात सर्वच जिल्ह्यात चौकशी होणार आहे. मागील ५ वर्षात नैसर्गिक आपत्ती मुळे झालेल्या नुकसानी नंतर झालेल्या अनुदानाची चौकशी होणार आहे. जालना संभाजीनगर, बीड , परभणी,लातूर नांदेड, धाराशिव ,हिंगोली इत्यादी जिल्ह्यात चौकशी होणार आहे.जालन्यात अतिवृष्टी अनुदानात ३४ कोटी ९७ लाख रुपयांचा घोटाळा झाल्याचं जिल्हाधिकाऱ्यांच्या अंतिम अहवालात उघड झालं होत. यात ३६ कर्मचाऱ्यावरती दोष सिद्धीचा ठपका ठेवण्यात आला आहे.

# अर्चनाताई व राज पाटील दांपत्यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्यचे पुरस्कार

**अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच तर राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र पुरस्कार.... १५ जून रोजी भास्कर पेरे पाटील यांच्या हस्ते होणार पुरस्काराचे वितरण**

बीड / वडवणी प्रतिनिधी अंकुश गवळी, सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य या अहिल्यानगर येथील राज्य स्तरावर काम करणाऱ्या नामांकित संस्थेच्या वतीने बीड जिल्ह्यातील तिगाव तालुका वडवणी येथील सरपंच सौ अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाला आहे. तर लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा बीड जिल्ह्यातील नामांकित सामाजिक कार्यकर्ते एडवोकेट राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र हा पुरस्कार या संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे या पुरस्काराचे वितरण आदर्श सरपंच भास्करराव पेरे



पाटील यांच्यासह राज्यातील नामांकित



राजकीय नेते मंडळीच्या उपस्थितीत १५ जून रोजी आहे अहिल्यानगर येथे होणार आहे.राज पाटील आणि सौ अर्चना राज पाटील हे दाम्पत्य मागील अनेक वर्षापासून सामाजिक सेवेमध्ये आहे. तिगावचे सरपंच पद राज पाटील यांच्याकडे आल्यापासून या गावाचा कायापालट झाला आहे. या गावात विविध जलसंधारणाच्या गोष्टी राबविण्यात आले आहेत. पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना पाहिजे असेल तर तीगावाला जायला पाहिजे या गावातील विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. संक्रातीच्या दिवशी अर्चना पाटील यांनी महिलांना साहित्य न वाटता पुस्तक आणि झाडाचे वाटप वाण वाटले हा आदर्श उपक्रम राबवणारी महाराष्ट्रातील पहिली ग्रामपंचायत तिगाव ग्रामपंचायत ठरली आहे. गावात वृक्ष संवर्धनासाठी खूप मोठा पुढाकार घेण्यात आला आहे. अर्चना पाटील आणि राज पाटील यांनी तिगावच्या विकासासाठी स्वतःला पूर्णपणे झोकून दिल आहे. त्यांनी स्वखर्चातून गावातील विविध वस्त्यांना या अगोदरच रस्ते करून दिलेले आहेत. गावातील सामाजिक सलोखा राखण्यासाठी ते नेहमी अग्रेसर असतात. सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र गुण्या गोविंदाने नांदतात यामध्ये तिगाव अग्रेसर आहे. या गावाचा कायापालट करण्यासाठी आपण पाहिजे तेवढे प्रयत्न करणार असल्याचे राज पाटील आणि त्यांच्या पत्नी अर्चना पाटील यांनी निर्धार केलेला आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन अर्चना राज पाटील यांना या सरपंच सेवा संघाने राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर केला आहे. तर राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र म्हणून पुरस्कार जाहीर केला आहे. या नवरा बायकोचा एकाच व्यासपीठावर भास्करराव पेरे पाटील आणि राज्यातील नामवंत समाजसेवक व राजकारणीच्या हस्ते सत्कार आणि सन्मान होणार आहे. हा सोहळा १५ जून रोजी अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे.हा पुरस्कार सर्वसामान्य जनतेच्या सेवेची पावती.. अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्कार मिळाला आहे तर राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मिळाल्यानंतर सामाजिक कार्यकर्त्यांसाठी दहा हत्तीचे बळ मिळते, पूर्वीही राज्यस्तरीय अनेक पुरस्कार राज पाटील यांना मिळाले आहेत. हा पुरस्कार जनसेवेची पावती आपल्याला मिळत असल्याची भावना ॲडव्होकेट राज पाटील यांनी प्रसार माध्यमांना बोलून दाखवली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com